# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.
# कोकण परिमंडल कार्यालय
# ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी

---

ग्राहक तक्रार क्र. २८/२०१३ दि. १२.०८.२०१३

| | |
|---|---|
| श्री.सुरेश श्रीकृष्ण मलुष्टे<br>घर क्रं.५४२,घोडवली<br>ता.संगमेश्वर,जि.रत्नागिरी | तक्रारदार ग्राहक |

विरुध्द

| | |
|---|---|
| कार्यकारी अभियंता, महावितरण,<br>विभागीय कार्यालय ,रत्नागिरी | विरुध्द पक्षकार |
| फोरम उपस्थिती | १) श्री. डी. एस्. जामखेडकर, अध्यक्ष<br>२) श्री. व्ही.बी.जगताप ,<br>सचिव तथा कार्यकारी अभियंता |
| ग्राहकाच्या वतीने | १) श्री.सुरेश श्रीकृष्ण मलुष्टे (अर्जदार)<br>२) श्री.जयंत पुरुषोत्तम बिवलकर(प्रतिनिधी) |
| विरुध्द पक्षकाराच्या वतीने | १) श्री.ओंकार किसन बारापात्रे<br>उपकार्यकारी अभियंता रत्नागिरी विभाग<br>२) श्री.रमेश बापूसाहेब कदम<br>सहाय्यक अभियंता,महावितरण<br>उपविभाग देवरुख |

**महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग, ग्राहक तक्रार निवारण मंच व लोकपाल(ओम्बुडस्मन) विनिमय २००३ मधील ८(२) चे तरतुदीनुसार :**

श्री.सुरेश श्रीकृष्ण मलुष्टे घर नं.५४३,मु.पो. घोडवली ता.संगमेश्वर,जि.रत्नागिरी यानी त्यांचे शेती पंपासाठी वीज कनेक्शन मिळणेसाठी केलेल्या अर्जानुसार विहीत वेळेत कनेक्शन न मिळाले मुळे फॉर्म 'अ' मध्ये दि. १२.०८.२०१३ रोजी मंचाकडे अर्ज दाखल केलेला आहे. अर्ज प्राप्त होताच मंचाचे पत्र क्रं.१७५ दि. १३.०८.२०१३ अन्वये कार्यकारी अभियंता विभागीय कार्यालय रत्नागिरी यांचेकडे स्पष्टीकरण मागविणेत आले. त्यानुसार कार्यकारी अभियंता विभागीय कार्यालय रत्नागिरी यानी आपले स्पष्टीकरण मंचाकडे दि.३१.०८.२०१३ रोजी सादर केले. त्यानंतर आयोगाच्या नियमावलीनुसार उभय पक्षाना सुनावणीची नोटीस काढण्यात येऊन दि. ०४.०९.२०१३ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अर्जदार श्री.सुरेश श्रीकृष्ण मलुष्टे यांच्या तक्रारीचे स्वरुप असे की, त्यांचे मु.पो. तुळसणी सर्व्हे नं. १३७४/१ मध्ये स्वतःचे मालकीची जमीन आहे. त्याच जमिनीमध्ये विहीर असून या विहीरीवर पंप बसविणेचा आहे व हया साठी विजेचे कनेक्शन मिळणे साठी उपविभागीय कार्यालय देवरुख यांचे कडे त्यानी दि. १९.११.२०११ रोजी अर्ज केलेला आहे त्यानंतर महावितरण कडून देणेत आलेल्या दि.२३.०२.२०१२ च्या कोटेशन प्रमाणे कनेक्शन साठी लागणारी रक्कम दि. १७.०३.२०१२ रोजी भरलेली आहे. त्यानंतर मात्र वेळोवेळी पाठपुरावा करुन देखील आजतागायत कनेक्शन दिले गेलेले नाही,

श्री.मलुष्टे यांचे शेत जमिनीमधील पंपासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या सिंगल फेज लघुदाब वाहिनीचे तीन फेज लघूदाब वाहीनीमध्ये कनव्हर्जन करणे जरुरीचे आहे व या करीता कोणत्याही जादा पोलची आवश्यकता नाही, इतके साधे काम असून देखील आज तागायत दोन वर्षाचा कालावधी होऊन देखील हे काम करण्यात येत नाही. प्रत्यक्ष भेटून चौकशी केली असता ठेकेदार उपलब्ध नसल्यामुळे पंपाचे कनेक्शन तुर्त देता येत नसल्याचे साचेबंद उत्तर मिळते. महाराष्ट्र वीज नियामक आयोग, वीजपुरवठा संहीता व अन्य अटी विनिमय २००५ कलम ४.४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे कनेक्शन तीन महीन्याचे आत देणे बंधनकारक आहे पण आज जवळ पास दोन वर्षे झाली तरी कनेक्शन देणेत आलेले नाही. त्यामुळे तक्रारदाराने विजेचे कनेक्शन लौकरात लौकर मिळावे तसेच कृती मानकांच्या केलेल्या उल्लंघना बाबत तरतुदी प्रमाणे भरपाई मिळावी अशी विनंती तक्रार दारानी अर्जात केलेली आहे या शिवाय वसूल करणेत आलेली सुरक्षा ठेवींची रक्कम अतिरिक्त असून ती अतिरिक्त रक्कम परत करणेत यावी व त्यावर बँकेचा नियमाप्रमाणे व्याज मिळणेबाबत देखील त्यानी आपल्या अर्जात विनंती केलेली आहे.

महावितरण कडून सादर करण्यात आलेल्या स्पष्टीकरणामध्ये नमुद केले आहे की, महाराष्ट्र वीज नियामक आयोग अधिनियम २००३ कलम ६.२ अन्वये तक्रारदारानी आपल्या तक्रारीचे निवारण होणेसाठी प्रथम अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे अर्ज करावयास हवा व त्या निकालावर समाधान न झाल्यास तक्रारदाराला मंचाकडे अर्ज करता येऊ शकतो पण अर्जदारानी या अटींचे पालन केलेले नाही त्यामुळे हा अर्ज मंचाकडून फेटाळणेत यावा अशी विनंती केली आहे.

तक्रारदाराचा दि.१९.११.२०११ रोजी अर्ज प्राप्त झालेनंतर दि.१७.०३.२०१२ रोजी अंदाज पत्रक मंजूर करण्यात येऊन कोटेशन देणेत आले त्यानुसार अर्जदारानी पंपाच्या कनेक्शन साठी आवश्यक रक्कम रु. ३०८३/- दि. २३.०१.२०१२ रोजी भरली आहे सध्यस्थितीत तक्रारदाराचा शेती पंपाचा अर्ज देवरुख उपविभागामधील प्रलंबित पंपाच्या जेष्ठता यादीनुसार १३ व्या क्रमांकावर आहे. मुख्य अभियंता (वितरण) मुख्य कार्यालय मुंबई तसेच डायरेक्टर (ऑपरेशन) मुख्य कार्यालय मुंबई यांचे आदेशानुसार वीज पंपाचे कनेक्शन जेष्ठता यादीनुसारच देणे गरजेचे आहे. त्यामुळे हे कनेक्शन मिळण्यासाठी विलंब होत आहे.

शिवाय हे कनेक्शन देण्यासाठी ०.६ किमी वाहीनीचे कनव्हर्जन करणे गरजेचे आहे. कोकण परिसरात अशी कामे करण्यासाठी ठेकेदार उपलब्ध होत नाहीत तसेच ही वाहीनी उभी करण्यासाठी लागणारे साहित्य देखील सध्य स्थितीत उपलब्ध नाही त्यामुळे देखील हे कनेक्शन देणेसाठी विलंब होत आहे. अशा परिस्थितीत जेष्ठता यादी डावलून हे कनेक्शन दिल्यास वरील १२ अर्जदारावर अन्याय केल्या सारखे होईल. या सर्व बाबींचा विचार करुन मंचानी निर्णय देण्याबाबत विनंती करण्यात आली आहे.

तसेच दि.०५.०९.२०१३ रोजी श्री.बिवलकर यानी अर्जदाराच्या वतीने पुरवणी म्हणणे सादर केले असून त्यामध्ये त्यानी तक्रारदाराची मंचाकडे अर्ज दाखल करण्यापूर्वी कक्षाकडे दि. ०६.११.२०१२ रोजी अर्ज केला होता व कक्षाने देखील या प्रकरणाचा निकाल दि. ०३.०१.२०१३ रोजी दिलेला आहे व हया उत्तराने समाधान न झाल्यामुळेच मंचाकडे यावे लागले असे नमूद केले आहे तसेच वीजपुरवठया संबंधी अर्ज दाखल केल्यानंतर एका वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्यामुळे अर्जदार मंचाकडे थेट अर्ज करु शकतो असे नमूद केले आहे.

दि. ०४.०९.२०१३ रोजी हया प्रकरणाची सुनावणी घेण्यात आली आहे. सुनावणी दरम्यान श्री. बिवलकर यानी अर्जदाराच्या वतीने बाजू मांडली, व नमुद केले की होणाऱ्या विलंबास अर्जदार जबाबदार नाही महावितरणच्या नियमानुसार सर्व अटींची पुर्तता करुन देखील आज जवळपास दोन वर्षे होत आहेत पण वेळोवेळी पाठपुरावा करुन देखील कनेक्शनचे काम होत नाही. वीज नियामक आयोगाच्या कृती मानके अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार हे कनेक्शन तीन महिन्यात मिळावयास हवे होते पण प्रत्येक पातळीवर विलंब होत असून महावितरण यासाठी दंडास पात्र आहे तसेच झालेल्या विलंबाबत कृती मानकांच्या तरतुदीनुसार अर्जदारास भरपाई मिळणे गरजेचे आहे.

महावितरणने आपल्या स्पष्टीकरणामध्ये कोकणमधील भौगोलिक परिस्थिती तसेच पावसाळा इत्यादी अडचणी विषद केल्या आहेत पण हे कनेक्शन रस्त्याच्या बाजूला आहे त्यामुळे भौगोलिक परिस्थिती या कनेक्शनच्य विलंबास कारणीभूत होऊ शकत नाही तसेच अर्ज केल्यापासून एकूण तीन पावसाळे गेले त्यामुळे अतिवृष्टीचा मुद्दा देखील गैर लागू होतो.

कनेक्शनसाठी घेण्यात आलेली अनामत रक्कम देखील नियमानुसार नसून, रु.२६५०/- इतकी रक्कम अतिरिक्त वसूल केलेली आहे. अशा प्रकारे युक्तीवाद करुन कनेक्शन लौकरात लौकर देणेबाबत तसेच भरपाई मिळणेबाबत विनंती केली.

महावितरणकडून श्री. बारापात्रे उपकार्यकारी अभियंता रत्नागिरी विभाग यानी आपला युक्तीवाद केला व कनेक्शन लौकरात लौकर देणेबाबत प्रयत्न करणेत येईल असे सांगितले तसेच स्पष्टीकरणामध्ये नमुद केलेल्या अडचणीमुळे कनेक्शन देणेची निश्चित वेळ सांगता येणार नसल्याचे नमुद केले.

प्रस्तुत प्रकरणामध्ये उभय पक्षामध्ये दाखल करणेत आलेली कागदपत्र तसेच उभय पक्षानी सुनावणी दरम्यान केलेला युक्तीवाद या सर्वांचा अभ्यास करुन मंचानी खालीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविलेला आहे.

तक्रारदाराची तक्रार मान्य करण्यात येत आहे. तक्रारदारानी नियमानुसार सर्व कागदपत्राची / अटींची पुर्तता केल्या नंतर ठेकेदार उपलब्ध नाहीत, साहित्य उपलब्ध नाही. किंवा भौगोलिक परिस्थिती अडचणींची आहे, इत्यादी बाबी करीता अर्जदार जबाबदार होऊ शकत नाही तक्रारदाराचा जेष्ठता क्रं.१३ वा आहे व वरील १२ कनेक्शन चे काम पूर्ण झाल्यानंतर हे कनेक्शन मिळणेसाठी अशा पध्दतीने काम करुन अजूनही कित्येक वर्षे लागतील, तसेच तक्रारदारानी तक्रार दाखल केल्यानंतर देखील महावितरण कनेक्शन देण्यासाठी निश्चित कालावधी सांगू शकत नाही, ही बाब निश्चितपणे गंभीर आहे.

हया सर्व बाबी जरी मान्य केल्या तरी फक्त सर्व्हे करुन कोटेशन देण्यासाठी महावितरणला तीन महीन्याचा कालावधी लागलेला आहे. अधिनियमामधील तरतुदीनुसार अर्ज प्राप्त झाल्यानंतर कोटेशन

फक्त ३० दिवसात देणे गरजेचे आहे व यासाठी भौगोलिक परिस्थिती कोणत्याही प्रकारे अडथळा निर्माण करीत नाही. त्यामुळे झालेल्या विलंबास महावितरण पूर्णपणे जबाबदार असून अधिनियमामधील तरतुदीनुसार दंडास पात्र आहे.

अतिरिक्त वसूल केलेल्या अनामत रक्कमेबाबत महावितरण कोणतेही स्पष्टीकरण देऊ शकलेले नाही त्यामुळे अतिरिक्त अनामत रक्कम परत करणे संयुक्तीक होईल असे मंचाचे स्पष्ट मत आहे.

मंचाने वरीलप्रमाणे नोंदविलेल्या निष्कर्षानुसार खालीलप्रमाणे आदेश देणेत येत आहे.

# आदेश

**१) अर्जदाराची तक्रार मान्य करणेत येत आहे.**

**२) प्रस्तुत प्रकरणातील शेती पंपाचे वीज कनेक्शन हा आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत वाहीनीचे काम पूर्ण करुन देणेत यावे, मात्र त्यानंतर होणाऱ्या विलंबास महावितरण अधिनियमातील तरतुदीनुसार दंडास पात्र राहील.**

**३) अर्जदाराकडून अतिरिक्त वसूल करणेत आलेली रु.२६५०/-(रु.दोन हजार सहाशे पन्नास मात्र) इतकी अनामत रक्कम दि.१५.१०.२०१३ पर्यन्त परत करण्यात यावी तसेच त्या रक्कमेवर बँकेच्या नियमाप्रमाणे व्याज देण्यात यावे**

**४) अर्जदारास खर्च व अनुषंगिक बाबी करीता रु.१०००/-(रु.एक हजार मात्र) महावितरणकडून दि.१५.१०.२०१३ पर्यन्त अदा करण्यात यावे.**

**५) वरीलप्रमाणे कार्यवाही पूर्ण झालेनंतर पुर्तता अहवाल मंचाकडे आठ दिवसाचे आत सादर करण्यात यावा.**

**६) या आदेशाविरुध्द ग्राहकास अपील करावयाचे असल्यास खालील पत्त्यावर हा आदेश मिळाल्यापासून ६० दिवसात दाखल करता येईल.**

**पत्ता :-**

**सचिव,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६/६०८,केशवा,**
**बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स,मुंबई ४०००५१**
**फोन नं. ०२२ - २६५२९६५**

**श्री. डी. एस्. जामखेडकर**
**अध्यक्ष**
**ग्रातनिमं, कोकण परिमंडल**

**श्री. व्हि.बी.जगताप**
**सचिव / कार्यकारी अभियंता**
**ग्रातनिमं, कोकण परिमंडल**

**दिनांक :- २४.०९.२०१३**
**ठिकाण :- रत्नागिरी**